डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

**कृषि विज्ञान केंद्र, लांजा, जि. रत्नागिरी**

जा.क्र./कृविके/काजू युनिट/३६०/२०२१ दिनांक :– ०२/०२/२०२१

**जाहीर नोटीस**

**विषय :** कृषि विज्ञान केंद्र, लांजा प्रक्षेत्रावरील ओले काजूगर प्रक्रिया संचातील निर्धारीत कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत....

कृषि विज्ञान केंद्र, लांजा प्रक्षेत्रावरील खालील विभागातील दि. **१८/०२/२०२१** ते दि. **२८/०२/२०२१** या कालावधीतील निर्धारीत कामे ठेका पध्दतीने करण्यासाठी इच्छूक ठेकेदारांकडून कामाच्या स्वरूपानुसार दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छूक ठेकेदारांनी ***कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, देवधे, ता. लांजा, जि. रत्नागिरी*** या नावे आपले दरपत्रक **दि. १६.०२.२०२१** पर्यंत या कार्यालयास सादर करावे.

**करावयाच्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | विभाग | करावयाच्या कामाचा तपशील | आवश्यक मजूर |
|---|---|---|---|
| ०१ | ओले काजूगर प्रक्रिया संच | प्रक्रिया संचाची साफसफाई, रंगरंगोटी करणे, ओले काजूगर प्रक्रिया करणे, पॅकिंग करणे, विक्री करणे, तसेच अनुषंगिक कामे करणे. | ०८ |
| | | **एकूण** | ०८ |

**दरपत्रके सादर करण्यासंबंधीच्या अटी व शर्ती :–**

- दिलेली कामे कार्यालयीन वेळेतच पूर्ण करावयाचे आहे. (सका. ०८ ते १२.३० व दुपारी ०२ ते ०५.३० )
- दरपत्रकात प्रती मजूर प्रती दिवस या प्रमाणे मजूरीचा दर नमूद करावा.
- ठेका कामासंबंधीच्या सविस्तर अटी व शर्ती या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावणेत आल्या आहेत. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयास संपर्क साधावा.( सका. ९.०० ते ०१.३० व दुपारी ०२ ते ०५.३० )
- कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचे हक्क या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

कार्यक्रम समन्वयक,
कृषि विज्ञान केंद्र,
देवधे,ता.लांजा (रत्नागिरी)

**प्रत प्रसिध्दीसाठी सस्नेह अग्रेषित :–**

१. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, दापोली

/– सदर पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे ही विनंती.

## ठेका कामासंबंधीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती

१. प्रक्षेत्रावरील कामे संबधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनुसार नेमुन देतील त्याप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२. कामाची देयकाची आदायगी महिना पुर्ण झाल्यानंतर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करतेवेळी मा. प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम वेळेत पुर्ण केलेबाबत दाखला जोडणे आवश्यक आहे.

३. निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

४. ठेकेदाराचे स्वत:चे पॅन कार्ड व बँक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्याअनुष्यंगीक रक्कम संबधित कामगारांच्या बँक खाती जमा करणे आवश्यक आहे.

५. ठेकेदाराने नेमलेल्या मजुरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

६. प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कामगारांकडुन नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

७. ठेक्यामध्ये असलेल्या मजुरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजुर विहीत कार्यपध्दती अवलंबुन नेमण्याचा अधिकार संबधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना राहील.

८. ठेक्यातील मजुरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निश्चीत केलेली असावी.

९. याचिका क्र.१५९१/२०१८ संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या दिनांक १८ एप्रिल,२०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क्र.५१(ई) नुसार याचिकाकर्त्या मजूरांना ठेकेदाराने सामावुन घेणे आवश्यक आहे.

१०. ठेकेदारामार्फत काम करणा—या कामगारांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

११. ठेकेदार व्यक्तीस/संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१२. ठेक्यासंबधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना/विद्यापीठ प्रशासनाला राहतील.

१३. दरपत्रके निम्नस्वाक्षरीकाराकडे बंद लखोटयातून पाठवावीत. लखोट्यावर ***ठेका कामाचे दरपत्रक – ओले काजूगर प्रक्रिया संच*** असा उल्लेख ठळकपणे नमूद करणे

१४. वरील सर्व बाबी मान्य असल्यास आपली दरपत्रके **दि. १६.०२.२०२१** पर्यंत बंद लखोटयातून निम्नस्वाक्षरीकाराकडे पाठवावीत.

Dhamnante

कार्यक्रम समन्वयक,
कृषि विज्ञान केंद्र,लांजा